ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# सेवांतर्गत प्रशिक्षण -ज्ञानाचे प्रवेशव्दार

**डॉ. सौ. स्वाती सदानंद ढोके**
*सेवा सदन कॉलेज ऑफ एज्युकेशन उल्हासनगर - ०३,जिल्हा ठाणे*

## Abstract

*२१ व्या शतकातील नवा शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणारा असा अपेक्षित नाही, किंबहुना विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा, स्फूर्ती व स्वावलंबनाची ताकद निर्माण करणारा असाच आहे. आजच्या बालकांच्या पंखात विविधांगी विशिष्ठ शक्तींचा प्रभाव अध्यापनातून निर्माण करुन सद्यस्थितीतील आधुनिक जगात उंच भरारी घेण्याची, उमेद निर्माण करणाऱ्या शिक्षकाची उणिव भासू नये यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण ही गुरुकिल्ली शिक्षकांना मदतीचा हात देत आहे.*

*Scholarly Research Journal's* **is licensed Based on a work at** *www.srjis.com*

## प्रस्तावना :

भारतासारख्या विविधतेने आणि परंपरेने नटलेल्या देशात आजही शिक्षकाचे स्थान अनन्य साधारण आहे. विद्यार्थ्यांना जीवंत, आनंददायी अनुभव देऊन समृध्द करणारा शिक्षक आजही शाळेच्या वर्गात दिसतात. कारण २१ व्या शतकातील नवा शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणारा असा अपेक्षित नाही, किंबहुना विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा, स्फूर्ती व स्वावलंबनाची ताकद निर्माण करणारा असाच आहे. आजच्या बालकांच्या पंखात विविधांगी विशिष्ठ शक्तींचा प्रभाव अध्यापनातून निर्माण करुन सद्यस्थितीतील आधुनिक जगात उंच भरारी घेण्याची, उमेद निर्माण करणाऱ्या शिक्षकाची उणिव भासू नये यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण ही गुरुकिल्ली शिक्षकांना मदतीचा हात देत आहे.

राज्यस्तरीय सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या माध्यमातून सकारात्मक दृष्टीकोन ठेवून नविन अभ्यासक्रमातील जे नवे आहे ते सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाते. सेवांतर्गत प्रशिक्षण ही शिक्षकांमध्ये विचार घडविणारी प्रक्रिया आहे. शिक्षकांना कार्यप्रवण बनवून वर्गात अध्ययनपूरक वातावरण निर्मिती करण्यासाठी प्रेरणादायक ठरणारी संजिवनी आहे. सेवांतर्गत प्रशिक्षणामुळे नवविचारांचा आणि नवप्रणालीचा शिक्षक तयार होतो. भारताचे पूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अपेक्षित असलेला ' महासत्ताभारत ' निर्माण करणारी तरुण फळी निर्माण होऊ शकते हा आत्मविश्वास या प्रशिक्षणामुळे शिक्षकांमध्ये निर्माण होतो. अशी प्रशिक्षणे गुणवत्तावर्धित शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. जे नविन आहे ते स्विकारण्याची व अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याची शक्ती शिक्षकांमध्येही प्रशिक्षणे निर्माण करतात.

**सेवांतर्गत प्रशिक्षणातून असा शिक्षक घडतो. :**

- शिक्षकांमध्‍ये उत्साह निर्माण करुन नविन शिक्षणप्रवाह, नविन अध्‍यापन पध्दतींचा विचार ओळख करुन दिली जाते.
- शिक्षकांच्‍या जबाबदाऱ्‍या व कर्तव्‍ये, मूल्‍यमापन पध्दतीतील बदल, नविन तंत्रज्ञानाचा वापर करण्‍यासाठी प्रोत्साहन दिले जाते.
- शिक्षकांमधील उपक्रमशिलतेला चालना मिळते, व स्वतःचे स्व-यंमूल्‍यमापन करण्‍याचे कौशल्‍य अंगी येते.
- शिक्षकांची मानसिकता सकारात्मक करण्‍यात सेवांतर्गत प्रशिक्षण मोलाचे ठरते. बहुमुल्‍य तज्ञ मार्गदर्शकांकडून प्रशिक्षण दिले गेल्‍यामुळे शिक्षकांमध्‍ये आत्मविश्वास निर्माण होतो.
- प्रशिक्षणाचे स्वरुप चर्चात्मक असल्‍यामुळे प्रशिक्षणानंतर नवप्रणाली आणि नविन व्‍यापक दृष्टीकोन शिक्षकांना मिळतो.
- विद्यार्थीकेंद्रित, कार्यप्रवण व कृतीकेंद्रित, भय-चिंतामुक्त आणि आनंददायी शिक्षण देण्‍याच्‍या दृष्टीने वर्गव्‍यवस्थापन आणि समाजाचा सहभाग यावरसेवांतर्गत प्रशिक्षणातून शिक्षकांना मार्गदर्शन मिळते.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरकरण्‍याचे कौशल्‍य तसेच प्रसार माध्‍यमांचा प्रभावी वापर करुन उपक्रमशील शिक्षक या प्रशिक्षणाच्‍या माध्‍यमातून तयार होतात.
- मूल्‍यमापनाबाबतचा नविन विचारप्रवाह, प्रचलित मूल्‍यमापनातील त्रुटी, समस्‍या व उपाय या प्रशिक्षणातून सुचविले जातात.
- क्षेत्रभेटीच्‍या आयोजनाने वेगवेगळ्‍या संस्थाना भेट देण्‍याची संधी मिळते व प्रत्‍यक्ष अनुभव शिक्षकांना दिला जातो. त्‍यामुळे शिक्षकांमध्‍ये सामाजिक जाणिवांचा विकास होण्‍यास मदत होते.

सध्‍याच्‍या युगात आपले विद्यार्थी यशस्वीपणे पुढे जाण्‍यासाठी शिक्षकांनी कायम गुणवत्ताधारक राहणे आवश्यक आहे. सेवांतर्गत प्रशिक्षणातून शिक्षकांना अनुभवातून समृध्दीकडे जाता येते. नव्‍या युगाचा प्रेरणादायी शिक्षक निर्माण करण्‍यात सेवांतर्गत प्रशिक्षण मोलाचे कार्यकरीत आहेत. निरंतर शिक्षण आणि नित्‍यबदलही प्रगतीची लक्षणे आहेत.

**संदर्भसूची :**

*शिक्षण संक्रमण २००१.*

*भारतीय शिक्षण २०१०.*

*रानडे मृदूला, प्रभावी अध्‍ययन - अध्‍यापन, नित्‍य नूतन प्रकाशन, पुणे २०१५.*